**ठळक बातम्या**

- राज्यातल्या २९ महापालिकांसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण, उद्या सकाळी साडे १० वाजता मतमोजणी सुरू होणार

- मतदानानंतर लावलेली शाई पुसली जात असल्याचा अनेकांचा आरोप, निवडणूक आयोगानं पुन्हा मतदान करता येण्याची शक्यता फेटाळली

- छत्रपती संभाजीनगरमध्ये ८ बोगस मतदारांना अटक, पुण्यात ईव्हीएम मध्ये बिघाड़, धुळ्यात मतदान यंत्राची तोडफोड

**आणि**

- १२ जिल्हा परिषद आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीची रणधुमाळी उद्यापासून सुरू होणार

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी आज मतदान झालं. सर्व महानगरपालिकांमधे मिळून सरासरी ५० टक्क्यांपर्यंत मतदान झाल्याचा अंदाज राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी व्यक्त केला. गेल्यावेळेच्या निवडणुकीपेक्षा यंदा अधिक मतदान झाल्याची माहिती त्यांनी दिली. उद्या सकाळी साडे दहा वाजता मतमोजणीला सुरुवात होणार असून ४ पर्यंत चित्र स्पष्ट होईल, असा अंदाज आहे.

दुपारी साडेतीन वाजेपर्यंत आलेल्या आकडेवारीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेत सुमारे ४२ टक्के मतदान झालं. कोल्हापूर महानगरपालिकेत सर्वाधिक सुमारे ५१ टक्के तर जळगावमधे सर्वात कमी सुमारे ३४ टक्के इतकंच मतदान झालं.

**राज्यातल्या** इतर महानगरपालिकांमध्ये दुपारी साडे ३ पर्यंत झालेलं मतदान

ठाणे ४४ टक्के

कल्याण डोंबिवली ३९ टक्के

नवी मुंबई साडे ४५ टक्के

उल्हासनगर ३५ टक्के

भिवंडी निजामपूर ३८ टक्के

मीरा भाईंदर ३८ टक्के

वसई विरार ४६ टक्के

पनवेलमधे  ४४ टक्के मतदान झालं.

नाशिक सुमारे ४० टक्के

मालेगाव ४६ टक्के

धुळे साडे ३६ टक्के

अहिल्यानगर साडे ४८ टक्के

पुणे सुमारे ३७ टक्के

तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत दुपारी साडे ३ पर्यंत ४० टक्के मतदान झालं होतं.

नागपूरमध्ये ४१ टक्क्यांपेक्षा जास्त

अमरावतीत सुमारे ४१ टक्के

अकोल्यात ४३ टक्के

चंद्रपूरात ३८ टक्के

आणि इचलकरंजीत दुपारी साडे ३ पर्यंत ४६ टक्के मतदान झालं होतं अशी माहिती राज्य निवडणूक आयोगानं दिली आहे.

सोलापूरात ४० टक्क्यांहून अधिक

सांगली मिरज कुपवाड सुमारे ४२ टक्के

छत्रपती संभाजीनगर ४३ टक्क्यांपेक्षा जास्त

नांदेड वाघाळामध्ये साडे ४२ टक्के

लातूरमध्ये साडे ४३ टक्के

परभणी ४९ टक्क्यांपेक्षा जास्त आणि

जालना महानगरपालिकेत दुपारी साडे ३ पर्यंत सुमारे ४६ टक्के मतदान झालं होतं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर महानगरपालिकेसाठी आज सकाळी मतदान केलं. मुंबईत केंद्रीय मंत्री पीयुष गोयल, खासदार रविंद्र वायकर, आमदार संजय उपाध्याय, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, राज ठाकरे या नेत्यांनी मतदानाचा हक्क बजावला. अभिनेता अक्षय कुमार, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर इत्यादी प्रसिद्ध व्यक्तिमत्वांनी मतदान केलं.

महानगरपालिका निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी लातूरमधल्या एका कापड दुकानदाराने विशेष ऑफर जाहीर केली होती. या उपक्रमांतर्गत, मतदान करून येणाऱ्या पहिल्या १५१ महिला मतदारांना दीड हजार रुपये किमतीची साडी अवघ्या १०० रुपयांत देण्यात आली, तर पहिल्या १५१ पुरुष मतदारांना १,००० रुपये किमतीची सफारी केवळ १०० रुपयांत देण्यात आली. यामुळे लातूरमधे मतदान केल्यानंतर या कापड दुकानावर मतदारांची झुंबड पाहायला मिळाली.

**<><><><><>**

टपाली मतपत्रिकांच्या पेट्या स्ट्राँग रूम अर्थात अभिरक्षा कक्षातून मतमोजणीच्या दिवशी म्हणजेच उद्या बाहेर काढल्या जातील असं निवडणूक आयोगाने स्पष्ट केलं आहे. या पेट्या आज दुपारी तीन वाजता अभिरक्षा कक्षातून बाहेर काढल्या जातील असं पत्र ८ जानेवारीला सर्व उमेदवारांना पाठवण्यात आलं

होतं. ते अनावधानाने पाठवलं होतं, असं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. उद्या या पेट्या बाहेर काढताना उमेदवार किंवा उमेदवाराच्या प्रतिनिधीने उपस्थित राहावं असं निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कळवलं आहे.

<><><><><>

राज्यात महापालिका निवडणुकीत मतदानानंतर मतदारांच्या बोटाला लावलेली शाई पुसण्याचे प्रकार उघडकीला येत आहेत. याबद्दल विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. यामुळे बोगस मतदानाची शक्यता फेटाळता येत नसल्याचं मंत्री संजय शिरसाठ यांनी व्यक्त केली. विरोधी पक्षाच्या काही नेत्यांनीही हीच भिती व्यक्त केली आहे.

काही ठिकाणी सर्व मतांची नोंद झाल्यावर 'बीप' आवाज येत नसल्याचा दावा खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. यामुळं सर्व प्रक्रिया संशयात सापडली असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.

पुण्यात काही मतदान केंद्रावर चौथ्या उमेदवाराला मत दिल्यावर मतदान यंत्रावरचा लाइट लागत नसल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अंकुश काकडे यांनी केला आहे.

<><><><><>

मतदारांनी एकदा मतदान केल्यानंतर त्याची नोंद घेतलेली असते. त्यामुळे फक्त शाई पुसून पुन्हा मतदान करता येणार नाही, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं होतं. शाई पुसायचा प्रयत्न करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करणं हे चुकीचं आहे, मतदानानंतर बोटावर लावलेली शाई पुसून एखादी व्यक्ती पुन्हा मतदानाला आल्याचं आढळून आलं, तर त्या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई केली जाते, असंही आयोगानं म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यात काही ठिकाणी मतदानाच्या प्रक्रियेत अडथळे आल्याचंही दिसून आलं. मतदारांची नावं आणि मतदान केंद्रं न जुळणं, तसंच कथित गैरप्रकारांच्या आरोपावरून काही ठिकाणी तणाव निर्माण झाला. छत्रपती संभाजीनगरमध्ये मतदानाचा प्रयत्न करणाऱ्या ८ बनावट महिला मतदारांना पोलिसांनी अटक केली. याविषयी अधिक जाणून घेऊ या आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हीसी***

बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदान करण्यात काही मुंबईकरांना अडचणी आल्या. मतदान केंद्रांची नावं, मतदारांची नावं यात तफावत असल्याचं आढळून आलं. निवडणूक कर्मचाऱ्यांनीही त्यांना दिलेल्या यादीतले फोटो वाईट असल्यामुळे पडताळणी करणं अवघड जात असल्याचं मत मांडलं.

पुणे महानगरपालिकेच्या मतदानाच्या वेळी ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने दुपारपर्यंत २० कंट्रोल युनिट्स आणि ५२ बॅलेट युनिट्स बदलण्यात आली. पिंपरी-चिंचवडमध्ये १५ ते २० ईव्हीएम्समध्ये बिघाड झाल्याचं माहिती पिंपरी-चिंचवडच्या निवडणूक प्रभारींनी सांगितलं.

अहिल्यानगरमध्ये एका मतदान केंद्र परिसरात बनावट ओळखपत्रं आढळल्याप्रकरणी पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांनी दिली.

मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त करूनही कर्तव्यावर हजर न राहिलेल्या जिल्हाभरातल्या १५५ कर्मचाऱ्यांविरोधात छत्रपती संभाजीनगर महापालिकेने गुन्हा दाखल केला आहे.

नाशिकमध्ये सिडकोत भाजपा उमेदवाराच्या घरून आणि घरामागच्या बागेतून पैसे वाटप होत असल्याच्या चर्चेमुळे झालेली गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला. जुने नाशिक गावठाण भागातही पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. याशिवाय किरकोळ बाचाबाची, पैसे वाटल्याच्या

तक्रारी आल्यामुळे नाशिक रोड भागातून एका उमेदवाराची मोटार जप्त करण्यात आली.

मालेगाव महानगरपालिकेतल्या एका निवडणूक केंद्राशेजारच्या एका घरात आज सकाळी एका प्लॅस्टिक पिशवीत ८०० पेक्षा जास्त मतदानपत्रं आढळून आली. प्राथमिक तपासात ही मतदानपत्रं खरी असल्याचं आढळून आलं असून पुढचा तपास सुरू आहे.

धुळ्यात प्रभाग क्रमांक १८ मध्ये भाजपाच्या कार्यकर्त्यांनी मतदान यंत्राची तोडफोड केली असा आरोप शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सतीश महाले यांनी केला. इथले मतदान काही वेळानंतर पुन्हा सुरू झाले. प्रशासनाकडून घटनेची चौकशी सुरू आहे.

या आणि इतर गैरप्रकारांवरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी वार्ताहर परिषद घेऊन निवडणूक आयोगावर निशाणा साधला.

***होल्ड... बाईट- उद्धव ठाकर***

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी उद्यापासून अर्ज भरायला सुरुवात होणार आहे. या टप्प्यात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांसाठी निवडणुका होणार आहेत.

२१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने यासाठी अर्ज भरता येतील. २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. याच दिवशी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होईल आणि मतदान चिन्ह वाटप होईल. ३ तारखेला मध्यरात्रीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि ५

फेब्रुवारीला सकाळी साडे ७ ते साडे ५ दरम्यान मतदान होणार असून ७ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

<><><><><>

गडचिरोली नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी भाजपाचे नवनिर्वाचित नगरसेवकनिखील चरडे यांची आज बिनविरोध निवड करण्यात आली. बीड नगर परिषदेच्या उपनगराध्यक्ष पदावर राष्ट्रवादी काँग्रेसचे विनोद मुळूक यांची निवड झाली आहे.

<><><><><>

महिला प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि युपी वॉरीअर्स यांच्यात सामना होणार आहे. नवी मुंबईतल्या डी वाय पाटील स्टेडिअमवर थोड्याच वेळात, म्हणजे साडे सात वाजता हा सामना सुरु होईल.

युपी वॉरीअर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

//<><><><><>//